# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
## Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University

सोलापूर -पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगांव, सोलापूर -४१३ २५५ (महाराष्ट्र)
Solapur-Pune National Highway, Kegaon, Solapur-413 255 (Maharashtra)
✆: ०२१७-२७४४७७०,७१,७२,७३,७४ फॅक्स : २३५१३००
ईमेल : dbee@sus.ac.in    संकेतस्थळ - http://su.digitaluniversity.ac  www.sus.ac.in    विस्तारीत क्रमांक : १३०




**◉ परीक्षा व मूल्यमापन मंडळ ◉ Board of Examinations and Evaluation ◉**

जा.क्र.पुअहोसोविसो/प.व मू.मं./फोटोकॉपी विभाग/२०२४/ 1448    दिनांक : 17 MAY 2024

## परिपत्रक - 38

**संदर्भ : पुअहोसोविसो/प. व मू. मं./फोटोकॉपी विभाग/२०२४/५४, दि.११/०१/२०२४ रोजीचे परिपत्रक क्र.०२**

विद्यापीठाशी संलग्नित असणा-या सर्व महाविद्यालयाच्या/संस्थेच्या प्राचार्य/संचालक यांना कळविण्यात येते की, ऑक्टो/नोव्हें-२०२३ च्या सत्रापासून बी.ए., बी.कॉम, बी.एस्सी., बी.बी.ए. व बी.सी.ए. या पाच अभ्यासक्रमातील प्रथम वर्षातील सर्व विषयांच्या परीक्षा महाविद्यालयस्तरावर घेण्यात येत असल्याने सदरच्या अभ्यासक्रमातील सर्व विषयांच्या परीक्षेकरीता विद्यार्थ्यांना द्याव्या लागणार उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत (Photocopy) आणि त्यानंतर होत असलेल्या उत्तरपत्रिकांच्या पूनर्मूल्यांकन (Revaluation) चे काम महाविद्यालयस्तरावर करण्याबाबत वरील संदर्भिय परिपत्रकन्वये कळविण्यात आलेले आहे. त्याच प्रमाणे **"मार्च/एप्रिल-२०२४"** या हंगामात ही वरील कामकाज महाविद्यालयास्तरावर करण्याबाबत सूचित करण्यात येत आहे.

**मार्च/एप्रिल-२०२४** च्या हंगामात वरील पाच अभ्यासक्रमातील प्रथम वर्ष वगळता, उर्वरीत सर्व अभ्याक्रमातील विषयांच्या फोटोकॉपीची छायांकित प्रत (Photocopy) विद्यापीठामार्फत संबंधित महाविद्यालयाच्या ईमेल-आयडीवर उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. त्याकरीता विद्यार्थ्यांनी महाविद्यालयामार्फत खालीलप्रमाणे विद्यापीठाकडे विहीत वेळेत अर्ज करणे बंधनकारक आहे.

१. Ordinance O.106(B) 2015 अन्वये वरील अभ्यासक्रमातील विषयाचा निकाल लागल्यापासून १५ दिवसापर्यंत विद्यार्थ्यांनाकडून पारंपारिक अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांनी प्रती उत्तरपत्रिकी शुल्क रु.२००/- आणि व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रती उत्तरपत्रिकी शुल्क रु.३००/- आकारुन पुढील तीन दिवसात विद्यापीठाकडे एकुण शुल्कासह जमा करावेत. नियमानुसार **प्रती सत्र केवळ दोन विषयांच्या** उत्तरपत्रिकांचे फोटोकॉपी महाविद्यालयाच्या ईमेलवर उपलब्ध करुन देण्यात येईल.

२. वरील अभ्यासक्रमातील द्वितीय व तृतीय वर्षातील सर्व विषयांच्या उत्तरपत्रिकेचे पूनर्मूल्यांकन करावयाचे झाल्यास सदर विषयांन करीता खाली दर्शविल्याप्रमाणे महाविद्यालयामार्फत **"ऑफलाईन"** अर्ज स्वीकारण्यात येतील, त्यांचे पूनर्मूल्यांकन ऑफलाईन / ऑनलाईन पध्दतीनेच करण्यात येईल.

वरील अभ्यासक्रमातील द्वितीय व तृतीय वर्षातील विषयांचे उत्तरपत्रिकेच्या फोटोकॉपीचे पूनर्मूल्याकंन प्रती विषय शुल्क रु.५००/- ऑफलाईन आकारुन एकुण शुल्कासह Ordinance O.07 नुसार फोटोकॉपी मिळाल्यानंतर ७ दिवस पर्यत विद्यापीठात जमा करावेत.

३. उपरोक्त प्रमाणे उत्तरपत्रिकेचे/पुनर्मल्याकंनाचे अर्ज महाविद्यामार्फतच घेण्यात येणार आहे. कोणत्याही परिस्थतीत विद्यार्थ्यांना थेट विद्यापीठाकडे पाठवू नये.

४. वरील अभ्यासक्रमातील **"फक्त प्रथम वर्षातील"** विषयांचे पूनर्मूल्यांकन महाविद्यालयस्तरावर झाल्यानंतर सदर विद्यार्थ्यांचे गुण सिलबंद लकोटयामध्ये परीक्षा व मूल्यमापन मंडळ विभागाकडे जमा करावेत.

५. उपरोक्त माहिती सादर करताना खालील तक्त्यामध्येच सादर करावी.

| Sr. No. | Course | Branch | Seat No. | PRN No. | Subject | Subject Code | Mix. Marks | Min. Marks | Obt. Marks | Reval Marks |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

**टिप :** ज्या परीक्षांचे निकाल सद्यस्थितीत विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द/जाहिर करण्यात आलेले आहेत, अशा विद्यार्थ्यांना सदरचे परिपत्रक निर्गमित झाल्यापासून फोटोकॉपीसाठी १५ दिवसाची मुदत राहील.

**खालील लिंक फक्त ऑफलाईन अर्ज करण्याकरीता उपयोगात आणावी.**

**Link:** https://www.sus.ac.in/examination/Circulars यामध्ये Cap and Revaluation Section मध्ये उत्तरपत्रिकेचे पुनर्मूल्यांकनाचे अर्ज (application form) पीडीएफ स्वरुपात उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.

(डॉ.श्रीकांत ग. अंधारे)
संचालक